Food, Civil Supplies and Consumer Protection Department
R.N.221, Second Floor, Mantralaya (Annex), Mumbai-400 032
Ph.No.022 22793368
E-mail ID: cp2.mhpds@gov.in Website:- http://mahafood.gov.in

## NOTICE

Applications are being invited through offline mode for the 17 posts of non-official member of State Consumer Protection Council constituted under Section 6 of Consumer Protection Act, 2019. These posts includes 6 posts for representatives of Consumer Organizations (At least one from each region, not exceeding six), 5 posts for person related to Consumer Protection Movement, representatives of Farmers, Trade and Industries, at least one of – Member each category, not exceeding six. Eligibility and appointment procedure of above mentioned post will be as per Government Resolution ragrap-2022/C.R-19/CP-2, dated 29.08.2022 **(Annexure -A and B)**. The said GR is available on www.maharashtra.gov.in and on www.mahafood.gov.in. The applicants have to submit their forms through personally visiting to office or by post from 23rd February 2026 to 23rd March 2026. Applicants please note that applications will not be accepted after 23rd March 2026.

(Note : In response to the advertisement dated 10.02.2023 for non-governmental member positions on the State Consumer Protection Council, all previously submitted applications are being retained. Therefore, applicants who have already applied, do not need to resubmit their applications.)

Deputy Secretary,
Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Manatralaya, Mumbai 32.

Mumbai,

Date: 23rd February, 2026

shivjob.com

Scanned with OKEN Scanner

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
दालन क्र.२२१, दुसरा मजला, मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी , ०२२-२२७९३३६८
ई-मेल:- cp2.mhpds@gov.in संकेतस्थळ:- http://mahafood.gov.in

# सूचना

ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ च्या कलम ६ मधील तरतूदीअंतर्गतच्या राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील १७ अशासकीय सदस्य पदाकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदामध्ये ग्राहक संघटनांचे प्रत्येक प्रादेशिक विभागातील किमान १ याप्रमाणे ६ प्रतिनिधी, ग्राहक चळवळीशी संबंधीत व्यक्ती -५, शेतकरी, व्यापारी व उद्योजक या प्रत्येक प्रर्वगातील किमान १, असे ६ पेक्षा अधिक नाही, यांचा समावेश आहे. या अशासकीय सदस्य पदांच्या पात्रतेचे निकष व निवडीबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय क्र. राग्राप-२०२२/प्र.क्र.१९/ग्रासं-२,दि.२९ ऑगस्ट, २०२२ (परिशिष्ट अ व ब) अन्वये राहिल. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in व http://mahafood.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्जदारांनी दि.२३ फेब्रुवारी, २०२६ ते दि.२३ मार्च,२०२६ सायंकाळी ६.०० पर्यंत प्रत्यक्ष कार्यासनास भेट देऊन किंवा पोष्टाने अर्ज सादर करता येतील. दि.२३ मार्च, २०२६ नंतरचे अर्ज स्वीकार केले जाणार नाही याची कृपया अर्जदारांनी दक्षता घ्यावी.

(टिप : राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्य पदांकरीता दि.१०.०२.२०२३ रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीन्वये विभागात प्राप्त झालेले अर्ज कायम ठेवून, व्यापक प्रसिध्दीकरिता नव्याने जाहिरात देण्यात येत आहे. सबब, पुर्वी अर्ज दाखल केलेल्या अर्जदारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही, ह्याची कृपया नोंद घ्यावी.)

उप सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ३२

मुंबई.
दिनांक:- २३ फेब्रुवारी, २०२६

shivjob.com

Scanned with OKEN Scanner

**राज्य / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे निकष व कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राग्राप-२०२२/प्र.क्र.१९/ग्रासं-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- २९ ऑगस्ट, २०२२

**वाचा -**

**१) शासन निर्णय क्रमांकः ग्राराप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२, दि. १९/१०/२०१३.**

**२) अधिसूचना क्रमांकः ग्रासंनि-२०२०/प्र.क्र.३९/ग्रासं-२, दि. १८/०२/२०२२.**

**प्रस्तावना -**

ग्राहक संरक्षण अधिनियम,२०१९ च्या कलम ६ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य स्तरावर राज्य ग्राहक संरक्षण परिषद व जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदा स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार उपरोक्त क्र.२ येथील दि.१८.०२.२०२२ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद) नियम,२०२२ तयार करण्यात आले आहेत. या परिषदांवर शासकीय व अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

राज्य / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवरील अशासकीय सदस्य म्हणून व्यक्ती / संस्थांची निवड अधिक पारदर्शकपणे होण्यासाठी अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीकरीता निकष व कार्यपध्दती यापूर्वी दि.१९.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली होती. तथापि, त्यावेळी अस्तित्वात असलेला ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ आता व्यपगत झाला असून ग्राहक संरक्षण अधिनियम,२०१९ हा दि.२०.०७.२०२० पासून लागू झाला आहे.त्यामुळे ग्राहक संरक्षण परिषदांवर शासकीय / अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता नव्याने निकष व कार्यपध्दती ठरविणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषद व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे निकष / कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद**

अ. राज्य परिषदेची उद्दिष्टे- ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ मधील कलम ६ खाली विहित केल्याप्रमाणे राज्यात ग्राहकांच्या हक्कांचे संवर्धन व संरक्षण करणे.

२. **राज्य ग्राहक संरक्षण परिषदेतील अशासकीय सदस्य**-दि.१८.०२.२०२२ च्या अधिसूचनेनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची प्रवर्गनिहाय संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे :-

shivjob.com

(क) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले,ग्राहक संघटनांचे **सहापेक्षा अधिक नसतील इतके प्रतिनिधी**.

(**ख**) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या, ग्राहकांच्या हिताशी संबंधित **पाच पेक्षा अधिक नसतील** इतक्या व्यक्ती.

(**ग**) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले शेतकरी, व्यापार व उद्योग क्षेत्रातील **प्रत्येकी एक असे सहा पेक्षा अधिक नसतील** इतके प्रतिनिधी.

(**घ**) वरील सदस्यांपैकी किमान पाच महिला सदस्य असावे.

३. **निवड समिती** –

**(अ)** राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची निवड करण्यासाठी खालील समिती गठित करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रधान सचिव/सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | अध्यक्ष |
| २) | प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ३) | अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी नामनिर्देशित केलेले आयोगाचे एक सदस्य | सदस्य |
| ४) | सह सचिव/उप सचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | निमंत्रक |

**(ब)** समितीने परि.४ येथील निकष विचारात घेऊन अशासकीय सदस्यांची निवड करावी. तसे करताना राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून संस्था व व्यक्तींची परि.२ (क) मधील एक संस्था व परि.२(ख), (ग) व (घ) मधील व्यक्तीपैकी किमान एक व्यक्तीची निवड करावी.

**(क)** ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ मधील कलम ६(२)(क) च्या तरतुदीनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर १० शासकीय किंवा अशासकीय सदस्य केंद्र शासनाने नियुक्त करावयाचे आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने अशासकीय सदस्यांची नावे उपलब्ध करुन देण्याची विनंती केल्यास, प्राप्त झालेल्या अर्जांमधून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचे अर्ज वगळून उर्वरित अर्जांमधून अशा सदस्यांची निवड, निवड समिती करेल. निवड झालेल्या उमेदवारांची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात येईल.

४. **पात्रतेचे निकष** – राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या खालील निकषांच्या आधारे करण्यात याव्यात.

**(अ)** ग्राहक संघटनांचे / संस्थांचे ६ प्रतिनिधी:-



shivjob.com

१) या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी संस्थेने ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे प्रशंसनीय काम केलेले असावे व संस्था लौकिकवान असावी.

२) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

३) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

४) संस्था जात, धर्म, वंश किंवा रंग असा भेदभाव न करता जनतेच्या सेवेसाठी ग्राहक चळवळीत कार्यरत असावी.

५) ग्राहकांच्या हिताची जपवणूक करणे व जागृती निर्माण करणे हे उद्दिष्ट संस्थेच्या घटनेत स्पष्टपणे अंतर्भूत असावे.

६) सारखेच हितसंबंध असणाऱ्या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

७) संस्थेने ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीव्दारे राज्यातील किमान दोन जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रात काम केलेले असावे.

८) संस्थेच्या प्रतिनिधीस मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

९) संस्था राजकीय/शासकीय/सांप्रदायिक तसेच स्वामित्व मालकीची नसावी.

१०) संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्यरत नसावी.

११) संस्थेला अस्तित्वात आल्यापासून ग्राहक कल्याण कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासनाने कधीही अपात्र ठरविलेले नसावे.

१२) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीविरुध्द गैरवर्तणूकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

१३) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

१४) संस्था आणि संस्थेमार्फत प्रस्तावित केलेला प्रतिनिधी शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.



shivjob.com

**(ब) ग्राहकांच्या हिताशी संबंधित ५ व्यक्ती :-**

(१) ग्राहक संरक्षण चळवळीशी संबंधित व्यक्तिंच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी त्या व्यक्तिंनी ग्राहक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात सलग ५ वर्षे काम केलेले असावे (उदा.प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी, इ.) व ती व्यक्ती लौकिकवान असावी.

(२) त्या व्यक्तिने ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे काम केलेले असावे.

(३) सारखेच हितसंबंध असणाऱ्या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(४) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात राज्यातील किमान दोन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात वैयक्तिकरित्या/संघटनात्मक काम केलेले असावे.

(५) ग्राहक संरक्षण कार्यासंबंधी यापूर्वी पुरस्कार/सन्मान मिळालेला असावा.

(६) त्या व्यक्तिस मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(७) त्या व्यक्तिला गैरवर्तणूकीसंदर्भात खटला दाखल हाऊन शिक्षा झालेली नसावी.

(८) त्या व्यक्तिने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(९) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(क) शेतकरी १ प्रतिनिधी :-**

(१) स्वत:शेती करणारा असावा.(शेतकरी असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील)

(२) ग्राहक म्हणून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांच्या जागृतीसाठी काम केलेले असावे.

(३) शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, औषधे, औजारे, पीकविमा, कर्ज इत्यादी मिळावे यासाठी चांगल्या गुणवत्तेचे काम केलेले असावे.

(४) एकसारखे ग्राहक हितसंबंध असणाऱ्या अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी/समस्यांचे निवारण करण्याकरिता काम केलेले असावे.

(५) गैरवर्तणुकीसंदर्भात, खटला दाखल होऊन त्यांना शिक्षा झालेली नसावी.

(६) त्याने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.



shivjob.com

(७) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(ड) व्यापार व उद्योग क्षेत्रातील प्रत्येकी १ प्रतिनिधी:-**

(१) स्वत: व्यापारी/उद्योजक असावा.(याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील)

(२) व्यापारी व उद्योजकांकडून ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेचा माल उपलब्ध होण्यासाठी व्यापारी / उद्योजकांमध्ये जागृती, प्रचार व प्रसार केलेला असावा.

(३) गैरवर्तणूकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(४) त्याने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(५) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

५. **राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती:-**

(१) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीकरिता परि. ४ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक प्रवर्गातील इच्छूक संस्था व व्यक्तींकडून अर्ज मागविण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने राज्य स्तरावरील किमान एक (शासकीय यादीवरील प्रतिष्ठित वृत्तपत्रात) इंग्रजी व मराठी दैनिकामध्ये जाहिरात द्यावी.

(२) वृत्तपत्रांतील जाहिरातीव्यतिरिक्त विभागाच्या संकेतस्थळावरदेखील याबाबतची माहिती देण्यात यावी.

(३) संबंधितांकडून **परिशिष्ट-अ** येथील नमुन्यात अर्ज मागविण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात यावी.

(४) अर्जासोबत **परिशिष्ट- ब** मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहील. असे साक्षांकन केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे. सांक्षांकित केलेल्या प्रती जोडल्या नसल्यास असा अर्ज अपात्र ठरविण्यात यावा.

(५) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्याची निवड करण्यासाठी परिच्छेद ३ मध्ये गठित करण्यात आलेल्या निवड समितीने प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन निवड केलेल्या उमेदवारांची शासनास शिफारस करावी. राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची निवड करतांना याकरीता जे निकष विहित करण्यात आले आहेत, त्या निकषांपैकी जास्तीत जास्त निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवाराची



shivjob.com

प्राथम्याने निवड करावी. निवड समितीच्या अशा शिफारशीप्रमाणेच अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने निर्गमित करावे.

(६) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवर जाहिरात देऊन एखाद्या प्रवर्गात आवश्यक अर्ज प्राप्त न झाल्यास उर्वरित अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी पुन्हा एकदा जाहिरात देण्यात यावी. त्यानंतर वरीलप्रमाणे निवड प्रक्रिया पूर्ण करावी.

(७) राज्य ग्राहक संरक्षण परिषदेवरील एकूण अशासकीय सदस्यांच्या संख्येच्या किमान पाच महिलांना प्रतिनिधित्व मिळेल, याची दक्षता निवड समितीने घेऊन त्याप्रमाणे महिला सदस्यांची निवड करुन त्यांच्या नावाची शिफारस शासनास करावी. निवड समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे शासनाने महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद

६. **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्य** -दि. १८.२.२०२२ च्या अधिसूचनेन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

(क) जिल्हा परिषदेचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ख) महानगरपालिका/नगरपरिषदांचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ग) पंचायत समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(घ) कृषि उत्पन्न बाजार समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(ङ) ग्राहक संघटनांचे **दहापेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(च) शाळा/महाविद्यालये यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(छ) वैद्यकीय व्यवसायिकांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(ज) व्यापार व उद्योग क्षेत्रांचे **प्रत्येकी एक** प्रतिनिधी,

(झ) पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(त्र) शेतकऱ्यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी.

७. **निवड समिती-**

(अ) जिल्हा स्तरावरील **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर** अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

shivjob.com

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबइ उपनगर जिल्हे वगळून) | अध्यक्ष |
| २) | संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ३) | जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष | सदस्य |
| ४) | सबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) | निमंत्रक |

(ब) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यात येईल. निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावे.

८. **निवडीचे निकष** - जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती खालील निकषांच्या आधारे करण्यात यावी:-

**(अ) अशासकीय संस्थांचे १० प्रतिनिधी**:-

(१) या प्रतिनिधींच्या निवडीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या दिनांकापूर्वी संस्थेने ग्राहक जनजागृतीसाठी संबंधित जिल्हयात सलग ५ वर्षे काम केलेले असावे व संस्था लौकिकवान असावी.

(२) संस्था नोदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत संस्था नोंदणीकृत असावी.

(३) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनाचे कार्य केलेले असावे.

(४) संस्था राजकीय/शासकीय/सांप्रदायिक तसेच स्वामित्व मालकीची (Proprietary) नसावी.

(५) संस्था जात, धर्म, वंश, रंग असा भेदभाव न करता जनतेच्या सेवेसाठी ग्राहक चळवळीत कार्यरत असावी.

(६) संस्था ही नफा मिळविण्याच्या उद्देशाने कार्यरत नसावी.

(७) ग्राहकांच्या हिताची जपवणूक करणे व जागृती निर्माण करणे हे उद्दिष्ट संस्थेच्या घटनेत स्पष्टपणे असावे.

(८) संस्थेला ग्राहक कल्याण कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासनाने संस्था अस्तित्वात आल्यापासून कधीही अपात्र ठरविले नसावे.

shivjob.com

(९) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीविरूध्द गैरवर्तणूकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(१०) संस्था व संस्थेच्या कोणत्याही प्रतिनिधीने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(११) सारखेच हितसंबंध असणाऱ्या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(१२) संस्थेने ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीव्दारे जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात काम केलेले असावे. ग्राहक संरक्षण अधिनियम व त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांची माहिती ग्राहकांना करून देण्यासाठी काम केलेले असावे.

(१३) संस्थेच्या प्रतिनिधीला मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(१४) संस्था आणि संस्थेमार्फत प्रस्तावित केलेला प्रतिनिधी शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

(ब) जिल्हा परिषदेचे (२ प्रतिनिधी), महानगरपालिका/नगरपरिषदांचे (२ प्रतिनिधी), पंचायत समितीचे (२ प्रतिनिधी), कृषि उत्पन्न बाजार समितीचे (२ प्रतिनिधी) व शाळा/महाविद्यालयांचे (प्रत्येकी १ प्रतिनिधी), या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांसाठी :-

(१) ग्राहक जनजागृतीसाठी जिल्हयात काम केलेले असावे. (उदा. प्रशिक्षण, प्रचार, प्रसार, प्रबोधन, प्रसिध्दी, इ.)

(२) सारखेच हित संबंध असणाऱ्या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे काम केलेले असावे.

(३) ग्राहकांच्या समस्यांसंदर्भात सर्वेक्षण व संशोधनाचे कार्य केलेले असावे.

(४) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(५) गैरवर्तणूकीसंदर्भात न्यायालयात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

**(क) वैद्यकीय व्यवसायाचे (२ प्रतिनिधी), व्यापार व उद्योग क्षेत्राचे (प्रत्येकी १ प्रतिनिधी), पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे (प्रत्येकी १ प्रतिनिधी)** :-

(१) ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेची सेवा/वस्तू उपलब्ध होण्यासाठी जागृती, प्रचार व प्रसार केलेला असावा.

shivjob.com

(२) ग्राहकांच्या समस्यांसदर्भात संस्थेने सर्वेक्षण व संशोधनात्मक कार्य केलेले असावे.

(३) सारखेच हितसंबंध असणाऱ्या अनेक ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी एकत्रितपणे कार्य केलेले असावे.

(४) ग्राहक संरक्षण, ग्राहक शिक्षण व ग्राहक चळवळ या संबंधात प्रशिक्षण, प्रबोधन, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी इत्यादीव्दारे काम केलेले असावे.

(५) मराठीचे व किमान इतर एका भाषेचे उत्तम ज्ञान असावे.

(६) गैरवर्तणूकीसंदर्भात खटला दाखल होऊन शिक्षा झालेली नसावी.

(७) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(८) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

**(ड) शेतकरी (२ प्रतिनिधी )** :-

(१) स्वत:शेती करणारा असावा.(शेतकारी असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील)

(२) ग्राहक म्हणून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांच्या जागृतीसाठी काम केलेले असावे.

(३) शेतकऱ्यांना चांगल्या गुणवत्तेचे बी-बियाणे, खते, औषधे मिळण्यासाठी काम केलेले असावे.

(४) एकसारखे हितसंबंध असणाऱ्या अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी/समस्यांचे निवारण करण्याकरिता काम केलेले असावे.

(५) गैरवर्तणूकीसंदर्भात खटला किंवा शिक्षा झालेली नसावी.

(६) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

(७) अर्जदार हा शासनाने बंदी घातलेल्या संघटनेशी किंवा संघटनेच्या कार्याशी संबंधित नसावा.

९. **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती:-**

**(१)** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील परि. ६ मधील प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी संस्थांचे इच्छूक प्रतिनिधी व व्यक्तींकडून अर्ज मागविण्याकरिता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्हयामध्ये शासनमान्य सर्वाधिक खप असलेल्या किमान एका मराठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात द्यावी.



shivjob.com

(२) वृत्तपत्रातील जाहिराती व्यतिरिक्त संबंधित जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर देखील याबाबतची माहिती देण्यात यावी.

(३) परि. ६ मधील प्रवर्गातील संस्था व व्यक्तींकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात यावी.

(४) अर्जासोबत परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक राहील. असे साक्षांकन केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. साक्षांकित केलेल्या प्रती जोडल्या नसल्यास अर्जदाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात यावा.

(५) समितीने परि. ८ मधील/निवडीचे निकष विचारात घेऊन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर जिल्हयातील वेगवेगळया भागातील संस्था व व्यक्ती यांना संधी मिळेल ही बाब लक्षात घ्यावी.

(६) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर संबंधित प्रवर्गातून आवश्यक अर्ज प्राप्त न झाल्यास उर्वरित अशासकीय सदस्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा जाहिरात देऊन विहित कार्यपध्दती अनुसरून उर्वरित अशासकीय सदस्यांची निवड करावी.

(७) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी दोन वेळा जाहिरात देऊनही अर्ज प्राप्त न झाल्यास संबंधित प्रवर्गातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी अशा प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या करण्यासाठी परि. ९(अ), ९(ब) व ९(क) मध्ये विहित केलेली कार्यपध्दती अनुसरावी.

(८) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील एकूण अशासकीय सदस्यांच्या संख्येमध्ये किमान पाच महिलांना प्रतिनिधीत्व मिळेल, याची दक्षता जिल्हा निवड समितीने घेऊन त्याप्रमाणे महिला सदस्यांची निवड करुन त्यांच्या नावाची शिफारस जिल्हाधिकाऱ्यास करावी. जिल्हा निवड समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

**(आ) परि. ८(१), (२), (३), (४) (९) या प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधींसाठी:-**

(१) संबंधित प्रवर्गात आपल्या जिल्हयात/कार्यक्षेत्रात असलेल्या सदस्यांची यादी जिल्हाधिकारी/ नियंत्रक, शिधावाटप यांनी तयार करावी. त्यांच्यापैकी इच्छूक असलेल्या प्रतिनिधींकडून अर्ज मागवावे.

shivjob.com

(२) अर्ज प्राप्त न झाल्यास या यादीतील वयाने जेष्ठ असलेल्या व खालील अट क्र. ३ ते ५ ची पूर्तता करणाऱ्या एक पुरुष व एक महिला सदस्यांची नियुक्ती करावी.

(३) त्यांनी ग्राहकांच्या हिताकरिता काम केलेले असावे / काम करण्याची त्यांची तयारी असावी.

(४) गैरवर्तणूकीबाबत खटला दाखल हाऊन शिक्षा झालेली नसावी.

(५) सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नसावा.

**(ब) शाळा व महाविद्यालयातील २ प्रतिनिधी:-**

१) जिल्हयातील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमधून एक व महाविद्यालयातून एक प्रतिनिधीची निवड करण्यात यावी. असे करतांना या प्रवर्गातून एक महिला व एक पुरुष सदस्याची निवड करावी.

२ ) जिल्हयात ज्या उच्च माध्यमिक शाळेत व महाविद्यालयात विद्यार्थी संख्या सर्वात अधिक आहे अशा शाळेच्या मुख्याध्यापकाची व महाविद्यालयाच्या प्राचार्यांची निवड करण्यात यावी.

**(क) वैद्यकीय व्यवसायिकांचे २ प्रतिनिधी:-**

जिल्ह्यात ज्या खाजगी रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी जास्तीत जास्त खाटांची सुविधा तसेच विविध आजारांच्या/रोगांच्या तपासणीच्या व्यापक सुविधा आहेत, अशा रुग्णालयातील वैद्यकीय व्यवसायाच्या नामवंत अशा एक महिला व एक पुरुष सदस्याची निवड करावी.

**मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद** :-

**१०. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची उद्दीष्टे -** ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ मधील कलम ८-ब खाली विहित केल्याप्रमाणे जिल्ह्यात ग्राहकांच्या हक्कांचे संवर्धन व संरक्षण करणे.

**११. जिल्हा ग्राहक परिषदेवरील अशासकीय सदस्य** - दि.१८.०२.२०२२ च्या अधिसूचनेन्वये नियंत्रक, शिधावाटप यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर खालील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे:-

(१) महानगरपालिकेचे **आठ पेक्षा कमी नसतील** इतके सदस्य,

(२) कृषी उत्पन्न बाजार समितीचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(३) ग्राहक संघटनांचे **दहापेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(४) शाळा/ महाविद्यालये यांचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,



shivlob.com

(५) वैद्यकीय व्यवसायीकांचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(६) व्यापार व उद्योग क्षेत्राचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी,

(७) पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे **दोन पेक्षा कमी नसतील** इतके प्रतिनिधी.

**१२. निवड समिती-**

**(अ)** नियंत्रक, शिधावाटप यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयासाठी). | - | अध्यक्ष |
| २) | नियंत्रक, शिधावाटप क्षेत्राकरिता पोलीस आयुक्त, मुंबई यांनी नामनिर्देशित केलेला एक पोलीस आयुक्त. | - | सदस्य |
| ३) | मुबई उपनगर जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष. | - | सदस्य |
| ४) | संबंधित उप नियंत्रक, शिधावाटप (मुख्यालय), नियंत्रक शिधावाटप कार्यालय, मुंबई. | - | निमंत्रक |

**(ब)** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यात यावी व निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांनी निर्गमित करावे.

**१३. पात्रतेचे निकष-**

परि. ८ मध्ये विविध प्रवर्गसाठी विहित केलेल्या निकषांच्या आधारे अशासकीय सदस्यांची निवड करण्यात यावी.

**१४. निवडीबाबतची कार्यपध्दती-**

परिच्छेद ९ मध्ये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यवाही विहित करण्यात आली आहे. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध प्रवर्गासाठी विहित केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी व निवड झालेल्या उमेदवारांचे आदेश नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी निर्गमित करावे.

**१५. नैमितिक रिक्त पदे भरणे:-**

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांचे पद मृत्यू, राजीनामा, इ. कारणास्तव रिक्त झाल्यास ते पद यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करून पात्र अर्जदारांमधून यथास्थिती राज्य / जिल्हा / मुंबई, ठाणे, शिधावाटप क्षेत्र या स्तरावरील निवड समितीच्या शिफारशीनुसार शासन / जिल्हाधिकारी / नियंत्रक, शिधावाटप यांच्याकडून शक्य

shivjob.com

तितक्या लवकर भरण्यात येईल. अशा रिक्त पदावर निवड केलेली व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी तिची नियुक्ती झाली असेल त्या व्यक्तीच्या उर्वरित पदावधीकरिता ते पद धारण करील.

१६. सदर आदेश विचारात घेऊन राज्य/जिल्हा / मुंबई, ठाणे, शिधावाटप क्षेत्रामधील ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीबाबतची कार्यवाही विनाविलंब सुरु करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०८२९१५३१४००६०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

CHARUSHILA
CHANDRAKANT
TAMBEKAR

Digitally signed by CHARUSHILA CHANDRAKANT TAMBEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=332dfd6e6db0a06570cca25f9c39add2bebc7d207b3405d11e474330d0a9e014, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B0496C0C213A3F50C6522CC39AE5DE95E1150AC3287E89C21B1422E313820A2, cn=CHARUSHILA CHANDRAKANT TAMBEKAR
Date: 2022.08.29 15:37:55 +05'30'

**( चारुशीला तांबेकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद.
२. सर्व मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य.
३. राज्यपालांचे सचिव.
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खासगी सचिव.
६. शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
७. पोलीस महासंचालक. मुबई.
८. सर्व पोलीस आयुक्त.
९. प्रधान सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल्य, विधान भवन, मुंबई.
१०. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक.
११. प्रबंधक उच्च न्यायालय. मुळ शाखा, मुबई,औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक उच्च न्यायालय. अपील शाखा, मुबई,औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक लेखा आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१४. सरकारी वकिल उच्च न्यायालय, मुळशाखा, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५. सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१६. सचिव माहिती आयोग, मुंबई.
१७. महासंचालक ,माहीती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.
१८. सर्व विभागीय आयुक्त.

shivjob.com

१९. सर्व महानगरपालिका.
२०. सर्व जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी.
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२२. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्न वितरण अधिकारी.
२३. सर्व मुख्यअधिकारी नगरपरिषद/ नगरपालिका.
२४. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य ग्राहक संरक्षण आयोग.
२५. प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक संरक्षण आयोग.
२६. अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत महामंडळ.
२७. मुख्य व्यवस्थापक,भारत संचार निगम लि. मुंबई.
२८. अध्यक्ष, महाराष्ट्र राजय परिवहन महामंडळ, मुबई.
२९. सर्व आयुक्त महानगरपालिका.
३०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका,
३१. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
३२. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
३३. परिवहन आयुक्त, मुंबई.
३४. सर्व मंत्रालयीन विभाग.
३५. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मंबई.
३६. नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई.
३७. उप नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई.
३८. सर्व सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
३९. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
४०.निवड नस्ती (ग्रा.सं.२).

shivjob.com

फोटो

## परिशिष्ट-अ

राज्य ग्राहक संरक्षण परिषद / जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना -

(१) संस्थेचे संपूर्ण नाव

(२) पूर्ण पत्ता

(३) संस्थेचा प्रतिनिधी म्हणून ज्या व्यक्तीस नामनिर्देशित करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता-

दूरध्वनी क्रमांक :

भ्रमणध्वनी क्रमांक :

ईमेल :

(४) वय-

(५) शैक्षणिक अर्हता-

(६) व्यवसाय-

(७) प्रवर्ग-

(ज्या प्रर्गातून नियुक्ती हवी आहे तो प्रवर्ग नमूद करावा.)

(८) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे स्वरूप -

(९) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कार्यक्षेत्र-

(१०) ग्राहकांच्या हितासाठी केलेल्या कार्याचा कालावधी-

केव्हापासून -

केव्हापर्यंन्त-

(११) किती ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यात आली व कोणत्या बाबीं बद्दल?

(१२) वरील कार्यामुळे किती ग्राहकांना नेमका कोणता फायदा प्रत्यक्षात झाला आहे?

(१३) वरील कार्यात उपलब्धीच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी व त्याकरिता मिळालेले पुरस्कार/ पारितोषिके, इ.

(१४) आपली निवड वरील परिषदेवर झाल्यास आपले काय योगदान राहील व कशाप्रकारे? (एका परिच्छेदात नमूद करावे)

(१५) सोबत जोडलेले पुरावे/कागदपत्रे.

---

मी श्री/श्रीमती -------------प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे. मी आणखी असे मान्य करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोट्या माहितीच्या आधारे मिळविलेली नियुक्ती रद्द होण्यास व फौजदारी कारवाईस मी पात्र राहीन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक- अर्जदाराची स्वाक्षरी

स्थळ - अर्जदाराचे नाव

shivjob.com

## परिशिष्ट-ब

राज्य/जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छूक व्यक्ती/संस्थांनी खालील प्रमाणपत्रे/कागदपत्रे जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे:-

**(अ) अशासकीय संस्थेकडून नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींसाठी:-**

(१) विहित नमुन्यातील अर्ज.

(२) अर्जासोबत अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषांच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

(३) गैरवर्तणूकीसंबंधी संस्थेविरूध्द/पदाधिकाऱ्यांविरूध्द खटला दाखल होऊन शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(४) शासनाने बंदी घातलेल्या संस्था/संघटना यांच्याशी संबंधित नसल्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(५) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली असल्याचे प्रमाणपत्र व घटनेची प्रत.

(६) संस्थेचे ध्येय व उद्देश.

(७) संस्थेचे बँक बॅलन्स प्रमाणपत्र.

(८) संस्थेचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प.

(९) संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडिटेड स्टेटमेंट.

(१०) संस्थेने ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे, त्या व्यक्तीचे संमतीपत्र.

**(ब) इतर अशासकीय सदस्यासाठी:-**

(१) विहित नमुन्यातील अर्ज.

(२) अर्जासोबत संबंधित व्यक्तीने ज्या प्रवर्गातील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीकरिता अर्ज केला आहे, त्यासाठी विहित केलेल्या निकषांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा पुरावा म्हणून सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.

(३) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे संबंधित जिल्हयाचे पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त यांचे किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

* * *

shivjob.com